# उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचे कार्यालय

सेनापती बापट मार्ग, सिम्बायोसिस कॉलेज समोर, पुणे-४११ ००४

दूरभाष क्रमांक : ०२० २५६६ ०५९३ ई-मेल : dycfpune@mahaforest.gov.in


**पत्र**

विषय:- वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत महर्षि वैदिक हेल्थ प्रा. लि. करिता ३९.२५ हेक्टर वनक्षेत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव...

जा.क्र.-ब/कक्ष-४-२/जमीन/एफसीए-९८/ १ /२०१९-२०.

पुणे - ४११ ००४. दिनांक-१ /०४/२०१९.

प्रति,

श्री. जय हनुमंत ढमे,
महर्षि वैदिक हेल्थ प्रा. लि.,
सी-१०, अभिमानश्री सोसायटी,
बाणेर रोड, पुणे- ४११ ००८.

संदर्भ:- आपलेकडिल दि. २५/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये या कार्यालयास सादर केलेला प्रस्ताव.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी वरील संदर्भान्वये आपण या कार्यालयास सादर केलेल्या वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचे प्रस्तावाची पडताळणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी असल्याचे दिसून येत आहे.

१. प्रस्तावामध्ये वनअधिकार कायदा २००६ अंतर्गत मा. जिल्हाधिकारी- पुणे यांचेकडिल विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित ग्रामपंचायतीचे सदर प्रस्तावाबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र प्रकरणी समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

२. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील Geo Reference नकाशामध्ये दोन्ही बाजूस N दर्शविलेले आहे. योग्य ती दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

३. आपण सादर केलेला प्रस्ताव हा ऑनलाईन प्रणालीवर आपले स्तरावरच प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. योग्य ती कार्यवाही करून ऑनलाईन प्रस्ताव या कार्यालयाचे लॉगीनवर येणे आवश्यक आहे.

४. आपण सादर केलेला प्रस्तावामधील वनक्षेत्र हे ३९.२५ हे. आहे. त्याबदल्यात ३९.२५ हे. पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर क्षेत्र उपलब्ध करून देण्यांत यावे. तसेच त्याबाबत आवश्यक ते दस्तऐवज, नकाशे, प्रमाणपत्रेही सादर करणे आवश्यक आहे.

५. आपण सादर केलेल्या प्रस्तावामध्ये गाव नकाशा जोडल्याचे दिसून येत नाही तरी प्रकरणी गाव नकाशा जोडणे आवश्यक आहे.

६. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील पार्ट-१ मध्ये दिनांक व स्थळ नमुद केलेले नाही. दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

७. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील प्रस्तावीत रस्त्याचे L Section व Cross Section जोडलेले नाहीत. ते प्रकरणी समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

८. प्रस्तावामध्ये प्रस्तावीत केलेल्या बांधकामाचे अंदाजपत्रक जोडलेले नाही. प्रकरणी ते समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

९. आपण सादर केलेल्या प्रस्तावामध्ये Cost Benefit Ration जोडलेला नाही. प्रकरणी ते समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करणेसाठी आपण या कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावाच्या ५ प्रती यासोबत परत करण्यांत येत आहेत. तरी सदर त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव ७ प्रतीत फेरसादर करावा ही विनंती.

सहपत्र:- वरीलप्रमाणे.

(श्रीलक्ष्मी ए.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग, पुणे.

प्रत:- १. सहा. वनसंरक्षक (सांख्यिकी/ वकँई), पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

२. वनपरिक्षेत्र अधिकारी- शिरोता यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

२/- त्यांना कळविण्यांत येते की, वरील बाधीत होणा-या वनक्षेत्रातील वृक्षांची मोजदाद, प्रजातीनिहाय, वेढीनिहाय माहिती तसेच वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व बाधीत होणा-या वनक्षेत्रामध्ये कोणती न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे किंवा कसे तसेच सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील स्थळपाहणी अहवाल याबाबतची माहिती सादर करण्यांत यावी. सोबत वरील प्रस्तावाची एक प्रत जोडली आहे.